**महाऑनलाईन संस्थेस संगणकीकृत**
**७/१२ चा डेटा उपलब्ध करून देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
माहीती व तंत्रज्ञान संचनालय,
मंत्रालय मुंबई-४०००३२
दिनांक २१/११/२०१२

# परिपत्रक

**वाचा-** १) शासन निर्णय क्रमांक.सामान्य प्रशासन विभाग, क्र.डिआयटी/जेव्हीटीएस/प्र.क्र.२० दिनांक-१६ सप्टेंबर २००८
२) शासन निर्णय क्रमांक-मातंस/प्र.क्र.२८/३९ दि.३० डिसेंबर २००८
३) शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती०८/प्रक्र११०/३९ दिनांक. २३ जून २००९
४) शासन निर्णय मातंस/नस्ती ०९/प्र.क्र.८९/३९ दिनांक-१५ जानेवारी २०१०
५) शासन निर्णय क्रमांक-महसुल व वन विभागाकडील संकीर्ण २०१०/प्र.क्र.६३/ल-१ सेल दि.२७ एप्रिल २०१०
६) शासन निर्णय क्रमांक मातंस/२०१२/प्रक्र १५२/३९ दि.२३ मे २०१२

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये संगणकीकृत ७/१२ चा डेटा महा ई-सेवा केंद्रांसाठी सामान्य प्रशासन विभाग, यांचेकडील शासन निर्णय मातंस/नस्ती ०९/प्र.क्र.८९/३९ दिनांक-१५ जानेवारी २०१० नुसार सर्व्हीस सेंटर एजन्सींना (SCA) जिल्हाधिकारी यांनी दरमहा सी.डी. व्दारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. शासनाच्या वतीने ऑनलाईन सेवा सुरु करण्यापर्यंत सदरची व्यवस्था तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली होती. ऑनलाईन सेवा पुरविण्यासाठी आणि तदअनुषंगीक कार्यवाहीसाठी TATA Consultancy Services लि. आणि महाराष्ट्र शासन यांची महाऑनलाईन ही संयुक्त संस्था (Joint Venture) स्थापित करण्यात आली आहे. या महाऑनलाईन संस्थेमार्फत ऑनलाईन सेवा पुरविण्याबाबत आणि शासकीय सेवांच्या सुसूत्रीकरणासाठी सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने शासन निर्णय क्रमांक मातंस/२०१२/प्रक्र १५२/३९ दि.२३ मे २०१२ नुसार आदेश निर्गमीत केला आहे. त्या अनुषंगाने महाऑनलाईन या संस्थेस संगणकीकृत ७/१२ च्या सी.डी. State Data Center कडे पोहोचविण्याची जबाबदारी सोपविण्याचा निर्णय विचाराधीन होता. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. जिल्हाधिकारी यांनी अदयावत संगणकीकृत ७/१२ च्या डेटाची जिल्हयाची सी.डी. दरमहिन्याला महाऑनलाईनच्या वतीने प्रत्येक जिल्हयांत नियुक्त केलेल्या समन्वय अधिकारी यांचेकडे सुपूर्त करावी.
२. जिल्हाधिकारी यांनी यापुढे महा ई-सेवा केंद्र चालविण्या-या सर्व्हीस सेंटर एजन्सी (SCA) यांना किंवा इतर कोणत्याही खाजगी कंपनीला संगणकीकृत ७/१२ च्या डेटाची सीडी देऊ नये.
३. महाऑनलाईन यांनी सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून अदयावत ७/१२ च्या सी.डी. प्राप्त करुन घेऊन State Data Center वर सदरचा डेटा Host करावा. दरमहा अशा सी.डी. प्रत्येक जिल्हयातून प्राप्त करुन घेऊन State Data Center मधील संगणकीकृत ७/१२ चा डेटा अदयावत ठेवावा.
४. महाऑनलाईनने महा ई-सेवा केंद्रांना State Data Center मधील डेटा मधून संगणकीकृत ७/१२ ची Print घेण्याकरीता सर्व महा ई सेवा केंद्रांना आणि सर्व सेतु केंद्रांना User ID उपलब्ध करुन देण्यात यावेत. महा ई-सेवा केंद्रांनी आणि सेतु केंद्रांनी अशा ७/१२ च्या Prints नागरीकांना विहीत फी आकारुन उपलब्ध करुन द्याव्यात.
५. State Data Center मधील संगणकीकृत ७/१२ चा अदयावत डेटा http://mahabhulekh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन जनतेस उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महाऑनलाईनची आणि राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र यांची राहील.

सेतु केंद्रांना आणि महा ई सेवा केंद्रांना महा ऑन लाईन मार्फत USER ID उपलब्ध करुन देई पर्यंत आणि SDC वर आवश्यक ती व्यवस्था करे पर्यंत जिल्हाधिकारी यांनी ७/१२ च्या सीडी महा ऑन लाईन च्या जिल्हा समन्वय अधिकारी यांचेकडे द्यावी. महा ऑन लाईन च्या जिल्हा समन्वय अधिकारी यांनी सदर ७/१२ च्या डेटाची सीडी सेतु केंद्र चालक आणि महा ई सेवा केंद्र चालविणा-या सर्विस सेंटर एजन्सी (SCA) यांना उपलब्ध करुन दयावी.

**(चंद्रकांत दळवी)**
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे

**(राजेश अग्रवाल)**
सचिव माहीती तंत्रज्ञान